**नांदेड जिल्हयातील हिमायतनगर (१२), देगलुर (११), हदगांव (१२), बिलोली (२६) व माहुर (०६) या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या ६७ वाळुघाटांकरीता दि १६.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

---

नांदेड जिल्हयातील हिमायतनगर, देगलुर, हदगाव, बिलोली, व माहुर या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या ६७ वाळुघाटांकरीता दि १६.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली.

जिल्हा खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचा प्रस्ताव या कार्यालयास दि १२ डिसेंबर २०२५ रोजी प्राप्त झाला त्याअनुषंगाने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे घेणेकरीता मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं बीओ/जेडी(डब्लुपीसी)/पीएच/बी-२५०११५-एफटीस-००३३ दि १५/०१/२०२५ अन्वये खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. मा. जिल्हाधिकारी नांदेड<br>तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड | -- | अध्यक्ष |
| २. प्रादेशिक अधिकारी,<br>म. प्र. नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर | -- | सदस्य |
| ३. उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म. प्र.नि. मंडळ, नांदेड. | -- | समन्वयक |

मा. जिल्हाधिकारी नांदेड तथा समिती अध्यक्ष यांच्या मान्यतेने सर्वप्रथम श्री. पि. व्ही. कांबळे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नांदेड तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरणप्रेमी गट, स्थानिक व इतर प्रतिनिधी यांचे हार्दिक स्वागत केले. समिती समन्वयक यांनी पुढे सांगितले की, या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीची सुचना भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया ३० दिवस आधी दि १४.१२.२०२४ रोजी देण्यात आली होती.

तसेच प्रस्तावित ६७ वाळु घाटासंबंधीत वाळु उत्खननाच्या पर्यावरणी व्यवस्थापन आराखाडाचा मसुदा कार्यकारी सारांश इंग्रजी व मराठी भाषेतील प्रती भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता विविध शासकिय कार्यालय तथा स्थानिक ग्रामपंचायत येथे सुचना/हरकती ई-मेल किंवा लेखी स्वरूपात देण्याबाबतचे आवाहन/जाहीर प्रकटन ३० दिवस आधी केले होते. सदील जाहीर प्रकटनाच्या अनुषंगाने १६ जानेवारी २०२५ या तारखेपर्यंत या कार्यालयास एकही निवेदन प्राप्त झाले नाही.

तद्नंतर समिती समन्वयक यांनी प्रकल्प धारकास विनंती केली की त्यांनी या प्रस्तावित ६७ वाळु घाटासंबंधीची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तवाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीचे सादरीकरण करावे.

प्रकल्प धारकानी सदरील प्रकल्प व पर्यावरण मुद्याविषयाबाबतचे खालील प्रमाणे सविस्तर सादरीकरण केले

- **लिलावाकरीता पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याकरीता प्रस्तावित वाळु घाटांची खालील यादी**

| अ.क्र. | रेती घाटाचे नाव | तालुका | नदी | लगतचे गट नं. | लांबीXरुंदीXखोली (मी. मध्ये) | लांबी (मी. मध्ये) | रुंदी (मी. मध्ये) | उत्खनन योग्य खोली (मी. मध्ये) | क्षेत्र हे.आर मध्ये | रेती साठा (ब्रास मध्ये) | प्रस्तावित कामगार | प्रस्तावित ट्रॅक्टर संख्या प्रति दिवस | प्रस्तावित वृक्षारोपण (नदी किनारा) | प्रस्तावित वृक्षारोपण (रस्ता किनारा) | प्रस्तावित पर्यावरणीय व्यवस्थापन रक्कम रु. लक्ष अंदाजे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | |
| १ | पिंपरी | हिमायतनगर | पैनगंगा | ४९/१, ४९/२, ५०, १/१, ४, ५ | २००X५०X०.५० | २०० | ५० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | ४० | ६८३ | ९.६४ |
| २ | विरसणी | हिमायतनगर | पैनगंगा | ८८/१, ८८/२ | १५५X६५X०.५० | १५५ | ६५ | ०.५० | १.०१ | १७८० | २८ | ७ | ३१ | २२०४ | २३.११ |
| ३ | रेणापुर बे. | हिमायतनगर | पैनगंगा | ८०, ८१ | २३०X४५X०.५० | २३० | ४५ | ०.५० | १.०४ | १८२९ | २८ | ७ | ४६ | ८९४ | ११.०९ |
| ४ | डोल्हारी | हिमायतनगर | पैनगंगा | १३१, १३२, १३६, १३७, १३८, १४० | २२५X४५X०.५० | २२५ | ४५ | ०.५० | १.०१ | १७८९ | २८ | ७ | ४५ | ४४८ | ८.०२ |
| ५ | बुदली बे. | हिमायतनगर | पैनगंगा | ३९, ४०, ४१, ४२, ४९, ५० | २५०X४५X०.५० | २५० | ४५ | ०.५० | १.१३ | १९८८ | २८ | ८ | ५० | १५९४ | १६.१९ |
| ६ | कामारी | हिमायतनगर | लाखडी | १८१, १८२, १८३, १८४,१९१ | ३५०X३०X०.५० | ३५० | ३० | ०.५० | १.०५ | १८५५ | २८ | ७ | ७० | ९८३ | ११.४४ |
| ७ | दिघी | हिमायतनगर | पैनगंगा | १२/१, १३/१ | २००X५५X०.५० | २०० | ५५ | ०.५० | १.१० | १९४३ | २८ | ७ | ४० | ८९९ | ११.०७ |
| ८ | धारापुर | हिमायतनगर | पैनगंगा | ७२, ७३,७४, ७६ | २५०X५०X०.५० | २५० | ५० | ०.५० | १.२५ | २२०८ | २८ | ८ | ५० | ७७९ | १०.३ |
| ९ | धानोरा ज. | हिमायतनगर | पैनगंगा | ७४, ७५, ७६, ७८ | २१०X५०X०.५० | २१० | ५० | ०.५० | १.०५ | १८५५ | २८ | ७ | ४२ | १४७० | १५.०७ |
| १० | पळसपुर | हिमायतनगर | पैनगंगा | ८२, ८३, ८५, ८९, ९७ | २५०X४०X०.५० | २५० | ४० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | ५० | १५०० | १५.४ |
| ११ | सिरपल्ली ज | हिमायतनगर | पैनगंगा | १३८, १४०, १४१, १४२, १४३, १५०, १५१, १५२ | २५०X४०X०.५० | २५० | ४० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | ५० | ३७८ | ७.५९ |
| १२ | कौठा ज. | हिमायतनगर | पैनगंगा | (४३,४८,४९,५०) | २५०X४०X०.६० | २५० | ४० | ०.६० | १.०० | २१२० | २८ | ८ | ५० | ७५० | १०.२४ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | तमलुर | देगलुर | लेंडी | २२२, २२६, २५७, २५८, ३०३, ३०१, २६३, २६४, २६५ | ७६५X३५X०.५० | ७६५ | ३५ | ०.५० | २.६८ | ४७३१ | ३८ | १८ | १५३ | १७०० | १९.५ |
| १४ | शेवाळा-१ | देगलुर | मांजरा | ३५४, ३५५, ३५६ | २००X१२०X०.५० | २०० | १२० | ०.५० | २.४० | ४२४० | ३८ | १६ | ४० | २७३४ | २५.८३ |
| १५ | शेवाळा-२ | देगलुर | मांजरा | ३५७, ३५८, ९० | २५०X७०X०.५० | २५० | ७० | ०.५० | १.७५ | ३०९२ | ३८ | १२ | ५० | २३५६ | ३०.३ |
| १६ | शेवाळा-३ | देगलुर | मांजरा | ९१, ९२, ३५२ | २८०X६०X०.५० | २८० | ६० | ०.५० | १.६८ | २९६८ | २८ | ११ | ५६ | २०१० | २१.४२ |
| १७ | शेळगांव-१ | देगलुर | मांजरा | गट नं.२३१, २३२ (सर्वे नं. ३९,४०,४४) | ३१५X१००X०.५० | ३१५ | १०० | ०.५० | ३.१५ | ५५६५ | ४८ | २१ | ६३ | १८६३ | ११.७७ |
| १८ | शेळगांव-२ | देगलुर | मांजरा | गट नं.१७७, १७८,१७९,१८० (सर्वे नं.६६) | २१०X६०X०.५० | २१० | ६० | ०.५० | १.२६ | २२२६ | २८ | ९ | ४२ | १८५० | ११.८५ |
| १९ | शेखापुर | देगलुर | मांजरा | (२१, २२, २३, २७) | ४२४X९०X०.५० | ४२४ | ९० | ०.५० | ३.८२ | ६७४२ | ४८ | २६ | ८४.८ | २२१८ | २२.०६ |
| २० | शेळगाव-३ | देगलुर | मांजरा | गट नं. १६६, १६७,१७५ (सर्वे नं.६७,६८) | ३००X५०X०.५० | ३०० | ५० | ०.५० | १.५० | २६५० | २८ | १० | ६० | १९०० | २०.१२ |
| २१ | शेळगाव-४ | देगलुर | मांजरा | गट नं.१३४, १३५, १३६ (सर्वे नं.१०६,१०७) | ४७०X१००X०.५० | ४७० | १०० | ०.५० | ४.७० | ८३०४ | ६८ | ३२ | ९४ | २१२० | २१.२४ |
| २२ | सांगवीउमर | देगलुर | लेंडी | २५, २६, २७, २८, ३८, १४२, १४३ | ४२०X३५X०.५० | ४२० | ३५ | ०.५० | १.४७ | २५९७ | २८ | १० | ८४ | ६४० | १०.१४ |
| २३ | मेढनकल्लुर | देगलुर | लेंडी | ८२, ८३, ८४, २२५, २२६, २२८ | ५५०X३५X०.५० | ५५० | ३५ | ०.५० | १.९३ | ३४०१ | ३८ | १३ | ११० | १९०० | २०.१४ |
| २४ | गोर्लेगाव-२ | हदगांव | पैनगंगा | १३३, १३४, १३५, १३६ | ४००X२५X०.५० | ४०० | २५ | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | ८० | १००९ | १४.०१ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | बेलमंडळ | हदगांव | पैनगंगा | १, ५, ६, ६/१, ६/२, ६/३, ९ | ५५०X२०X०.५० | ५५० | २० | ०.५० | १.१० | ११४३ | २८ | ७ | ११० | १७८० | १८.१४ |
| २६ | गुरफळी १ | हदगांव | पैनगंगा | ५, ६, ७, ८, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९ | ५००X२०X०.५० | ५०० | २० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | १०० | ८३७ | ११.५४ |
| २७ | साप्ती | हदगांव | पैनगंगा | ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८६ | ५००X२०X०.५० | ५०० | २० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | १०० | ९०० | ८.७ |
| २८ | मनुला बु | हदगांव | पैनगंगा | ३०८ to ३१३ | ५००X२०X०.५० | ५०० | २० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | १०० | ३०० | ३.९७ |
| २९ | वैंकलपुर | हदगांव | कयाधु | (५०,५१,१,२) | ४००X२५X०.४० | ४०० | २५ | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | ८० | ७५० | ९.१ |
| ३० | बोरगाव हा. | हदगांव | कयाधु | ६६, ३१४, ३१५, ३१६ | ३५०X३०X०.५० | ३५० | ३० | ०.५० | १.०५ | १८५५ | २८ | ७ | ७० | ८०० | १०.४ |
| ३१ | हस्तारा | हदगांव | कयाधु | १६८,१६९,१७०,१७१,१७२ | ५००X२०X२.३० | ५०० | २० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | १०० | ६५० | ११.९ |
| ३२ | गुरफळी २ | हदगांव | पैनगंगा | २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६ | ६००X२०X०.५० | ६०० | २० | ०.५० | १.२० | २१२० | २८ | ८ | १२० | २४०७ | २२ |
| ३३ | बनचिंचोली | हदगांव | पैनगंगा | १३९/१/A,१३९/B, १३९/३, १४०/A, १४४ | ५००X२०X०.५० | ५०० | २० | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | १०० | २०४८ | २० |
| ३४ | गोर्लेगाव १ | हदगांव | पैनगंगा | १/३, १/४, २/४, ३/१, ४ | ३५०X३०X०.५० | ३५० | ३० | ०.५० | १.०५ | १८५५ | २८ | ७ | ७० | | |
| ३५ | बामळी | हदगांव | पैनगंगा | ४२, ४३,४५, ४६, ६६,६७, ६८,६९, ७० | ४००X२५X०.५० | ४०० | २५ | ०.५० | १.०० | १७६७ | २८ | ७ | ८० | १५२९ | १६.३१ |
| ३६ | सागरोळी १ | बिलोली | मांजरा | ३६१, ३६२ | २१०X१००X०.८० | २१० | १०० | ०.८० | २.१० | ५९३६ | ३८ | २३ | ४२ | ८१९ | १०.९२ |
| ३७ | सागरोळी २ | बिलोली | मांजरा | ४५१, ४५७, ४५९, ४६० | ४००X१००X०.८० | ४०० | १०० | ०.८० | ४.०० | ११३०७ | ६८ | ४३ | ८० | १३१२ | १४.६३ |
| ३८ | सागरोळी ३ | बिलोली | मांजरा | ३३४, ३३५ | ४५०X१००X०.८० | ४५० | १०० | ०.८० | ४.५० | १२७२१ | ६८ | ४९ | ९० | ११०६ | १२.९ |
| ३९ | येसगी १ | बिलोली | मांजरा | २३० | ११०X१६०X०.९० | ११० | १६० | ०.९० | १.७६ | ५५१७ | ६८ | २२ | २२ | २४४७ | २२.७ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | येसगी-२ | बिलोली | मांजरा | २२९, २३० | २५० X१२० X०.८० | २५० | १२० | ०.८० | ३.०० | ८४८१ | ६८ | ३३ | ५० | २४४० | २२.५७ |
| ४१ | येसगी-३ | बिलोली | मांजरा | २३३ Center Side | २५० X१२० X०.८० | २५० | १२० | ०.८० | ३.०० | ८४८१ | ६८ | ३३ | ५० | २२०९ | २३.०९ |
| ४२ | येसगी-७ | बिलोली | मांजरा | २३३ East | १३० X१२० X०.७५ | १३० | १२० | ०.७५ | १.५६ | ४१३४ | ४८ | १६ | २६ | २५०९ | २२.८८ |
| ४३ | बोळेगांव-१ | बिलोली | मांजरा | २८८ Center Side | ३०० X१५० X०.८० | ३०० | १५० | ०.८० | ४.५० | १२७२ १ | ६८ | ४९ | ६० | १०२३ | १२.५९ |
| ४४ | बोळेगांव-३ | बिलोली | मांजरा | ३२० West Side | ३०० X१५० X०.८० | ३०० | १५० | ०.८० | ४.५० | १२७२ १ | ६८ | ४९ | ६० | ५५९ | १०.१८ |
| ४५ | गंजगांव-१ | बिलोली | मांजरा | २१३ | २०० X९० X०.८० | २०० | ९० | ०.८० | १.८० | ५०८८ | ४८ | २० | ४० | ३४०० | २५.३५ |
| ४६ | गंजगांव-२ | बिलोली | मांजरा | २३९, २४० | २५० X१०० X०.८० | २५० | १०० | ०.८० | २.५० | ७०६७ | ६८ | २७ | ५० | ३४०० | २९.१५ |
| ४७ | गंजगांव-३ | बिलोली | मांजरा | २९७, २९९ | २१० X१०० X०.८० | २१० | १०० | ०.८० | २.१० | ५९३६ | ५८ | २३ | ४२ | २८०० | २५.२१ |
| ४८ | गंजगांव-४ | बिलोली | मांजरा | २८३,२९७ | २३९X१००X०.७० | २३९ | १०० | ०.७० | २.३९ | ५९१२ | ५८ | २३ | ४७.८ | २८०० | २५.६१ |
| ४९ | गंजगांव-५ | बिलोली | मांजरा | ३२५, ३२६, ३५४ | ३५०X१००X०.८० | ३५० | १०० | ०.८० | ३.५० | ९८९४ | ६८ | ३८ | ७० | २८०० | २५.७५ |
| ५० | गंजगांव-१० | बिलोली | मांजरा | ३५८ | १३०X१००X०.७५ | १३० | १०० | ०.७५ | १.३० | ३४४५ | ३८ | १३ | २६ | ३१५७ | २७.९९ |
| ५१ | कार्ला बु.-१ | बिलोली | मांजरा | १४७, १६१ | २४०X१००X०.५० | २४० | १०० | ०.५० | २.४० | ४२४० | ४८ | १६ | ४८ | १६९५ | १७.३९ |
| ५२ | कार्ला बु. ९/१ | बिलोली | मांजरा | १६१ | २५०X१००X०.५० | २५० | १०० | ०.५० | २.५० | ४४१७ | ४८ | १७ | ५० | १६९५ | १७.४७ |
| ५३ | कार्ला बु.-३ | बिलोली | मांजरा | १००, १०१, १०९ | ३५०X११०X१.०० | ३५० | ११० | १.०० | ३.८५ | १३६० ४ | ६८ | ५२ | ७० | १५०० | १६.८ |
| ५४ | माचनुर-१ | बिलोली | मांजरा | १४ | २००X१२०X०.८० | २०० | १२० | ०.८० | २.४० | ६७८४ | ५८ | २६ | ४० | ३५८० | ३१.०१ |
| ५५ | माचनुर-२ | बिलोली | मांजरा | २८, २९, ३०, ३१ | २००X१२०X०.८० | २०० | १२० | ०.८० | २.४० | ६७८४ | ६८ | ५४ | ७६ | ३५८० | ३०.०९ |
| ५६ | माचनुर-३ | बिलोली | मांजरा | १५ East Side | २३०X१००X०.७० | २३० | १०० | ०.७० | २.३० | ५६८९ | ५८ | २२ | ४६ | ३५८० | ३१.०९ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५७ | माचनुर-१ | बिलोली | मांजरा | ५२ | २७५X८०X०.८० | २७५ | ८० | ०.८० | २.२० | ६२१९ | ६८ | २४ | ५५ | २४०० | २२.८८ |
| ५८ | माचनुर-८ | बिलोली | मांजरा | ५२ West | ३१०X८०X०.७० | ३१० | ८० | ०.७० | २.४८ | ६१३४ | ६८ | २४ | ६२ | १४३४ | १६.३५ |
| ५९ | नागणी-१ | बिलोली | मांजरा | १२१, १२२ | १८०X१२०X०.५० | १८० | १२० | ०.५० | २.१६ | ३८१६ | ३८ | १५ | ३६ | १६७७ | १७.०१ |
| ६० | नागणी २ | बिलोली | मांजरा | १२३,१२४,१२५ | १७०X१२०X०.५० | १७० | १२० | ०.५० | २.०४ | ३६०४ | ३८ | १४ | ३४ | १६७७ | १६.९६ |
| ६१ | हुनगुंदा | बिलोली | मांजरा | ३५२,२११ | २९५X१५०X०.८० | २९५ | १५० | ०.८० | ४.४३ | १२५० ९ | ६८ | ४८ | ५९ | १७७५ | १८.२७ |
| ६२ | टाकळी | माहुर | पैनगंगा | ७, ८, ९, ८३, ८४, ८५, ८६, ८७ | २५०X५०X०.५० | २५० | ५० | ०.५० | १.२५ | २२०८ | २८ | ८ | ५० | ५१२ | ८.६९ |
| ६३ | सायफळ | माहुर | पैनगंगा | २, ४, ५, ६ | ३००X३५X०.७५ | ३०० | ३५ | ०.७५ | १.०५ | २७८३ | २८ | ११ | ६० | २८२५ | २५.१८ |
| ६४ | नेर | माहुर | पैनगंगा | ७, ८ | २५०X५०X०.५० | २५० | ५० | ०.५० | १.२५ | २२०८ | २८ | ८ | ५० | ३६५ | ४.८७ |
| ६५ | दिगडी बु | माहुर | पैनगंगा | ८, ५८/A | २५०X५०X०.५० | २५० | ५० | ०.५० | १.२५ | २२०८ | २८ | ५ | ३० | ४४० | ४.५५ |
| ६६ | पडसा | माहुर | पैनगंगा | २२५, २२६, २२९, २३०, २३१ | ३००X३५X१.०० | ३०० | ३५ | १.०० | १.०५ | ३७१० | ३८ | १४ | ६० | ३७० | ४.७५ |
| ६७ | सांजी | माहुर | पैनगंगा | १५, १६, १७, ७८, ७९ | २५०X५०X०.५० | २५० | ५० | ०.५० | १.२५ | २२०८ | २८ | ८ | ५० | २२३७ | २०.७७ |

• रेतीघाटांसाठी प्राप्त आवश्यक अनुमती/परवानग्या व गोषवारा.

| | |
|---|---|
| प्रकल्प प्रवर्तक | जिल्हा खनिकर्म अधिकारी नांदेड. |
| प्रकल्प स्थिती | नवीन, प्रस्तावित रेती घाट |
| उत्खनन करावयाचे खनिज | रेती/वाळू (बांधकाम योग्य) |
| रेतीघाट प्रस्तावित करणारी समिती | मा. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या व भुवैद्यन्यानिक, म.प्र.नि.म. यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका तांत्रिक समिती |
| उत्खननाकरिता ठरवून दिलेला कालावधी | दि. 10 जुन ते 30 सप्टेंबर पर्यंतचा मानसून कालावधी वगळता जास्तीत जास्त 1 वर्ष. |

**• प्रस्तावित उत्खनन पद्धत :**

रेती उत्खनन टोपले,पावडे द्वारे मजुरांकरवी करण्याचे प्रस्तावित आहे.

अ. मातीचे ढिगारा किंवा मातीचे उत्खनन करता येणार नाही.

ब. रेती उत्खनन टोपले,पावडे द्वारे मजुरांकरवी करण्याचे प्रस्तावित आहे.

क. उचललेली रेती ट्रॅक्टर द्वारे वाहण्याचे प्रस्तावित आहे.

ड . ट्रॅक्टर वगळता कोणतीही अवजड व यांत्रिक मशीनरी उपयोगात आणता येणार नाही.

इ. उत्खननाकरिता ठरवून दिलेला कालावधी हा दि. 10 जुन ते 30 सप्टेंबर पर्यंतचा मानसून कालावधी वगळता जास्तीत जास्त 1 वर्षाकरिता प्रस्तावित आहे.

**• वायू प्रदूषण उपाय योजना**

| अ. क्र | प्रदूषणाचे स्रोत | अपेक्षित परिणाम | व्यवस्थापन योजना |
|---|---|---|---|
| 1 | ट्रान्सपोर्ट रोड/रेती वहन मार्ग | हवा गुणवत्ता /जमिन रास्ता मजबूती रस्त्याचा ऱ्हास | •वहन मार्गाचे मजबूती करण<br>• वहन मार्गाची देखभाल<br>• ट्रॅक्टर मध्ये मान्यताप्राप्त क्षमतेनुसार खनिज वहन<br>• उत्खनन कालावधी दरम्यान हवा दर्जा तपासणी |
| 2 | ट्रक/ट्रॅक्टर यांचे चलन | हवा दर्जा /गुणवत्ता | •मान्यता प्राप्त क्षमते पेक्षा ट्रॅक्टर मध्ये खनिज न भरणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | •रेती वाहन करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीज टरपोलिन ने वहन दरम्यान झाकणे.<br>•वाहनांना गती नियंत्रक बसविणे.<br>•रेती घाटावर रेती ट्रॅक्टर मध्ये भरताना इंजिन बंद ठेवणे. |
| 3 | रेती घाट व रेती घाट मार्ग | उत्खनन प्रक्रिया | • रेतीघाट होलेज मार्गाची वारंवार दुरुस्ती व देखभाल<br>•कामगारांना डस्ट मास्क देणे.<br>• रेती उत्खनन व वहन दिवसाचं करणे |
| 4 | नदी किनाऱ्याचे व्यवस्थापन | नदी किनाऱ्याची झीज पूर रेषा व्यवस्थापन | • नदी किनाऱ्यावर झाडे लावणे<br>• नदी किनार्याच्या उतारावर हिरवळ(ग्रास) लावणे |

**• व्यवसाय, आरोग्य व सेवा योजना**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | धूळ कन श्वसन विषयी व्यवसाय सुरक्षितता, आरोग्य व सेवा योजना | कामगारांची सुरक्षितता व उत्खनन | •कामगारांसाठी पर्यावरण पूरक व सुरक्षित वातावरण तयार करणे.<br>•असे वातावरण व उपाययोजना अंमल बजावणीसाठी मान्यता प्राप्त निविदाधारक/ठेकेदार उपायोजना करेल.<br>•कामगारांना वैय्यक्तिक संरक्षण उपकरने प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.<br>•कामगारांना आवश्यक प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.<br>•प्रथोमपचार पेटी, पिण्या योग्य पाणी ,तात्पुरत्या निवार्याची सोय करण्याचे प्रस्तावित |

**• ध्वनी प्रदूषण**

- कामगारांना कांन बुचे देण्याचे प्रस्तावित आहे
- ट्रॅक्टर/ट्रक व्यतिरिक्त कोणत्याही ध्वनी प्रदूषण करणाऱ्या मशीनरी प्रतिबंधित आहेत.
- ट्रॅक्टर चे एंजिने रेतीघाटावर रेती भरते वेळेस बंद ठेवण्यात येईल
- कामगारांची आरोग्य विषयक तपासणी करण्यात येईल.
- कामगारांना व अभ्यंगताना वैयक्तिक सरंक्षक उपकरणे देण्यात येईल.

**•वाहतूक व्यवस्थापन**

• खनिज वाहतूक करणारे वाहन फॉरेस्ट व महसूल विभागाकडे नोंदणीकृत करणे प्रस्तावित आहे.

• अश्या सर्व वाहनाकडे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असण्याचे बंधनकारक असेल.

• अशी सर्व वाहने ध्वनी उत्सर्जन व धूळ/इतर उत्सर्जन संबंधी मानक द्वारे उच्च प्रतीच्या देखभाली खाली प्रमाणित असतील.

• असे सर्व वाहनचालक वाहतुकीसंबंधी नियमांचे पालन करण्यास बध्य असतील.

• अश्या सर्व वाहनांची गती नियंत्रित केलेली असेल.

• क्षमतेपेक्षा जास्त खनिजाचे वाहन करता येणार नाही.

• खनिज वाहन करणाऱ्या वाहनांचे खनिज टरपोलिन ने झाकण्याचे प्रस्तावित आहे.

• इतर रेती ठेकेदारांसोबत समनव्यय साधून रेतीचे वाहन करण्याचे प्रस्तावित आहे जेणेकरून वाहतुकीचा खोळंबा होणार नाही.

**• वृक्षारोपण योजना**

• मान्सून दरम्यान (दि. 10 जून ते 30 सप्टेंबर) नदी किनाऱ्यावर व वाहन मार्गावर झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे.

• नीम, पिंपळ, करंज,गुलमोहर अशी स्थानिक झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे.

• मान्य निविदाधारक/रेती ठेकेदार ह्या पर्यावरण व्यवस्थापन योजनेचे टेबल करा. 1 अनुसार दिलेल्या व्यवस्थापन अंदाजानुसार क्रियान्वयन करण्याचे प्रस्तावित आहे.

• मान्य निविदाधारक /रेती ठेकेदार सादर पर्यावरण व्यवस्थापन योजना क्रियान्वयनाचा अनुपालन अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी , तत्सम तहसीलदार यांना सादर करेल.

• जिल्हा खनिकर्म अधिकारी/तत्सम तहसीलदार हा पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या क्रियान्वयनाची वेळोवेळी खात्री करतील व मा. जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला अहवाल वाळू निर्गमीती च्या धोरण मध्ये सुचविल्याप्रमाणे सादर करतील.

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नांदेड तथा समन्वयक गठीत लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

**उपस्थितांनी उपस्थित केलेले आक्षेप, नोंदी व सुचना इत्यादी खालिलप्रमाणे**

१. **श्री. विश्वनाथ रामचंद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य, सगरोळी, ता बिलोली, जि. नांदेड**
सगरोळी येथे दोन वाळुघाट चालु आहेत. परंतु शासकिय वाळु घटांची योजना व त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने त्या ठिकाणी होत नाही. नदीपात्रातुन वाळुची वाहतुक ही बाहेरील ठेकेदारांमार्फत करण्यात येते. सदर वाळुघाटांवरील वाळु भरणेसाठी जेसीबी चा वापर केला जातो त्यामुळे स्थानिक मजुर व रोजगारावर परीणाम होतो. वाळुची वाहतुक ट्रॅक्टरद्वारे केली तर रस्तेपण खराब होणार नाहीत. तसेच विविध शासकीय योजनांसाठी जसे की, घरकुल धारकांरिता लागणारी वाळू मिळणेसाठी ऑनलाईन प्रक्रीया सुरु आहे ती अत्यंत किचकट असुन ती सोपी करण्यात यावी. नदीपात्रातुन उत्खनन करताना नदीच्या काठालगत न करता मध्यभागातुन करण्यात यावे जेणेकरुन नदीच्या पाण्याचा प्रवाहावर परिणाम होणार नाही. वाळु उत्खननामुळे नदी पात्रात झाडे-झुडपांची वाढ झाल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असुन मांजरा नदीच्या प्रवाहात बदल होऊन पाण्याचा प्रवाह काठावारून होत असल्याने शेजारील शेतीचे नुकसान होत आहे. वाहतूकीदरम्यान वाहनांच्या क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतुक होणार नाही याची दक्षता घेतली तर रस्ते खराब होणार नाही व अपघात देखील टळतील.

२. **श्री. विठ्ठल व्यंकट तुकडेकर, उपसरपंच, गोळेगाव, ता बिलोली, जि. नांदेड**
वाळु घाटांतुन प्राप्त महसूलातील २५ टक्के रक्कम ही संबंधीत गावांच्या विकास कामांकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी.

३. **श्री. गंगाराम खटने, रा. कारला, ता. बिलोली, जि. नांदेड.**
वाळु घाटांतुन वाळू उत्खनन करतांना स्थानिक मजुंराकडुनच सदर वाळु उत्खनन करण्यात यावे.

मा. अध्यक्ष पर्यावरण लोकसुनावणी समिती तथा जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, वाळु वाहतुक करण्याकरीता ट्रॅक्टरचाच वापर करण्यात यावा किंवा रस्त्याची गुणवत्ता सुधारण्यात येईल. तसेच वाळुघाटांच्या लिलावानंतर वाळु उत्खनन करण्याकरीता शाश्वत पध्दतीचा अवलंब केला जाईल.

जिल्हा खनिकर्म विकास कार्यक्रमाअंतर्गत ज्या ठिकाणी वाळु घाट आहेत त्या ठिकाणी विकासकामांबाबत योजना राबविण्यात येणार आहे याबाबत योग्य ती नोंद घेण्यात येईल.

सदस्य, पर्यावरण लोकसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी यांनी विचारणा केली की, सदर वाळूघाटाचे ठिकाणी काम करणा-या स्त्री-पुरुष मजुरांना तसेच, उपस्थितांना मोबाईल टॉयलेटची सोय केली आहे किंवा कसे ? तसेच वाळू उत्खनन करुन वाहतूक करणा-या वाहनांना जी.पी.एस. यंत्र लावणे बंधनकारक आहे किंवा कसे?

पर्यावरण सल्लागार यांनी असे उत्तर दिले की, मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येणार असून ती नदीपात्रापासुन २० मीटर दूर इतक्या अंतरावर असणार आहे. तसेच सर्व वाहतुक करणा-या वाहनांवर जी. पी. एस. यंत्र लावणे हे बंधनकारक करण्यात येणार आहे.

मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनवणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषित केले.

**(पि. व्ही. कांबळे)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नांदेड

**(मनिष होळकर)**
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर

**(अभिजीत राऊत)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा जिल्हाधिकारी, नांदेड